# प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती
दि.३१/०८/२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा, व कार्यालयाचा पत्ता | श्री.भरत शेषरावजी निस्ताने, वय ४८ वर्ष, पद ग्रामसेवक, देवरी निपाणी, ता.भातकुली, जि.अमरावती, वर्ग–३. |
| ३ | अपराध घडला तारीख | दि.३१/०८/२०२० चे १४/३५ वा. |
| ४ | लाच मागणी केलेली रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ५ | स्विकारली लाच रक्कम | तडजोडीअंती २०,०००/–रु. |
| ६ | घटनास्थळ | जिवन प्राधिकरण कार्यालयासमोर, कठोरा नाका, अमरावती. |

यातील तक्रारदार त्याच्या गुराढोराचे शेणखत गावाच्या बाजूला शासकीय जागेवर टाकतात. ती शासकीय जागा असून तक्रारदाराच्या गावातील ग्रामसेवक निस्ताने यांनी दि.३१/०८/२०२० रोजी तक्रारदारास नोटीस दिली की, ते खत त्यांनी तात्काळ उचलले नाही तर त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व कायदेशीर कार्यवाही करायची नसेल तर संदर जागा ८ अ नुसार तक्रारदाराच्या नावावर करुन देण्यासाठी ३०,०००/–रु. लाचेची मागणी केल्याबाबत तक्रारदाराने दि.३१/०८/२०२० रोजी लेखी तक्रार अ‍ॅकब्यु कार्यालयात दिली.

प्राप्त लेखी तक्रारीवरुन शासकीय पंचासमक्ष आज दि.३१/०८/२०२० रोजी पडताळणी केली असता तक्रारदाराने लेखी तक्रारीमध्ये नमुद केल्याप्रमाणे शासकीय जागा ८ अ नुसार तक्रारदार यांच्या नावावर करुन देण्यासाठी ग्रामसेवक निस्ताने यांनी तक्रारदारास तडजोडीअंती २०,०००/–रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याने तात्काळ सापळा कार्यवाहीचे नियोजन करुन सापळा कार्यवाही केली असता आलोसे निस्ताने यांनी जीवन प्राधिकरण कार्यालयासमोर, कठोरा नाका, अमरावती येथे तक्रारदार यांना बोलावून पंचासमक्ष २०,०००/–रुपये लाच रक्कम स्विकारल्याने निस्ताने यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.श्रीकांत धिवरे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, अपर पोलीस अधीक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे व पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक संतोष शेगांवकर, नापोकॉ. प्रमोद धानोरकर, पो.कॉ.आशिष जांभोळे व चालक अकबर हुसेन यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क्र. – ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर – १०६४.

(संतोष शेगांवकर)
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती

Scanned with CamScanner